## नगरपरीषद प्रशासक मुख्याधिकारीचे साफ दुर्लक्ष

# बीडमध्ये मोकाट कुत्र्यांची संख्या प्रचंड वाढली

# लहान मुलांना रस्त्यावर फिरणेही अवघड झाले

### या मोकाट कुत्र्यांनी अनेकांना चावुन जखमी केले





बीड । दिव्य न्युज

शहरात गेल्या काही महिन्यांपासून मोकाट कुत्र्यांची संख्या प्रचंड वाढली आहे. रस्त्यावर जागोजाग कुत्र्यांच्या झुंडीच्या झुंडी फिरत असल्यामुळे लहान मुलांना रस्त्यावरुन फिरणे सुद्धा अवघड झाले आहे. लहान मुलांनाच काय पण कुत्र्यांच्या झुंडी पाहून मोठ्यांना सुद्धा जीव मुठीत घेऊन चालावे लागत आहे. कुत्र्यांचा प्रचंड सुळसुळाट सुरु असतांनाही नगर पालिकेकडून मात्र याकडे दुर्लक्ष होत असून कुत्र्यांचा बंदोबस्त करण्यासाठी नगर पालिका कुठलेच पाऊल उचलायला तयार नसल्याने नागरिकांमधून संताप व्यक्त होऊ लागला आहे.

बीड शहरामध्ये गेल्या काही महिन्यापासून प्रचंड प्रमाणात कुत्र्यांची दहशत निर्माण झाली आहे. प्रत्येक गल्लीत, रस्त्यांवर कुत्र्यांच्या झुंडीच्या झुंडी बसत असल्यामुळे लहान मुलांना चालणे फिरणे देखील अवघड झाले आहे. नगर पालिकेकडून कुत्र्यांचा बंदोबस्त करण्यासाठी काहीच पावले उचलली जात नसल्याने हे कुत्रे लोकांच्या जिवावर उठू लागले आहेत. दोन दिवसापुर्वीच एका शाळकरी विद्यार्थिनीवर कुत्र्यांनी हल्ला चढविला होता. असे प्रकार सर्रास होत असल्याने शाळांमध्ये जाणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये प्रचंड भीती निर्माण होऊ लागली आहे. नगर पालिकेने मोकाट कुत्र्यांच्या बंदोबस्तासाठी तातडीने कार्यवाही करावी अशी मागणी पालकवर्गातून होऊ लागली आहे.

## मुख्याधिकारीने करोडों भ्रष्टाचाराची गुढी उभारण्यात साथ देणार्या आमदार,अधिकारी,नगरसेवकांची चौकशी करून गुन्हे दाखल करा - रशिद शेख

माजलगाव । दिव्य न्युज



गुत्तेदाराचे काम करण्यासाठी माजलगाव नगर परिषदेचे मुख्याधिकारी चंद्रकांत चव्हाण यांनी तब्बल १२ लाख रुपयांच्या लाचेची मागणी केली. त्यानंतर तडजोड करुन सहा लाख रुपयांच्या लाच स्विकारतांना राहत्या घरीच चव्हाणला छत्रपती संभाजीनगर एसीबीने रंगेहाथ पकण्यात आले.पकडलेले लाजखोर मुख्याधिकारी चंद्रकात चव्हाण याने करोडोंची मालमत्ता जमा करण्यात आमदार,अधिकारी, नगरसेवकांनी हातभार लावलेला आहे त्यामुळे आमदार , अधिकारी नगरसेवकांची तात्काळ चौकशी करून गुन्हे दाखल करा अशी मागणी सामाजिक कार्यकर्ता शेख रशिद यांनी केली आहे.

शासकीय कामांशी संबंधित फाईल्स मंजूर करून देने, टेंडर मंजूर करने , सामान्य नागरिकांचे साधे काम करण्यासाठी पैसेची मागणी करण्यात येत होती तसेच आमदाराची हात व साथमुळे मुख्याधिकारीची डेरिंग वाढली होती कोणत्याही कामात आथिर्क देवाणघेवाण होत होती.भ्रष्टाचार मुख्याधिकारी शासकीय कामात करोडो रुपये कमावले त्यात चार पाच नगरसेवक,अधिकारी मिळुन करोडोंचा भ्रष्टाचार केलेला आहे. कामानिमित्त सामान्य नागरिकांनी मुख्याधिकारीला फोन केला तरी फोन घ्यायला तयार नव्हते.शहरात पाणीपुरवठाचे नियोजन ढासळली होती पंधरा पंधरा दिवस पाणी भेटतं नव्हते,शहरात स्वच्छता नव्हते व मुलभूत सुविधा भेटतं नसल्यामुळे नगरपरिषद प्रशासनाच्या विरोधात सामान्य नागरिक नाराजगी बोलुन दाखवत होते . भ्रष्टाचार मुख्याधिकारी यांनी शासकीय कामात करोडो रुपयांची गुढी उभारण्यात आलेल्या आमदार, अधिकारी, नगरसेवकांची चौकशी करून गुन्हे दाखल करा अशी मागणी सामाजिक कार्यकर्ता शेख रशिद यांनी केली आहे.

## मिल्लीया महाविद्यालयात आरोग्य तपासणी व आयुर्वेदिक उपचार शिबिर

बीड । दिव्य न्युज

येथील मिल्लिया विज्ञान व व्यवस्थापनशास्त्र महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभाग व युनिकेअर हेल्थ सेंटर मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने शुक्रवार दिनांक ११ जुलै २०२५ रोजी आरोग्य तपासणी व आयुर्वेदिक उपचार शिबिर आयोजित करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रोफेसर हुसैनी एस.एस., युनिकेअर हेल्थ सेंटर मुंबईचे डॉ. कौशिक सुर्वे, डॉ.सुनील महाजन, डॉ.अवधूत कोरे, डॉ.तृप्ती अस्कट, डॉ. दिपाली परबे, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी प्रोफेसर रमेश वारे, प्रा. शोएब पिरजादे, प्राध्यापिका डॉ. शामल जाधव यांची उपस्थिती होती. राष्ट्रीय सेवा योजनेच्या कार्यक्रमाधिकारी प्राध्यापिका डॉ. शामल जाधव यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रोफेसर हुसैनी एस.एस यांनी शिबिराचा मुख्य उद्देश आरोग्य विषयक जागरूकता निर्माण करणे व आयुर्वेदिक उपचारांची उपयुक्तता समजावून सांगणे हा आहे असे सांगितले. या शिबिरात वैद्यकीय तज्ज्ञांनी मोफत आरोग्य तपासणी केली तसेच आयुर्वेदिक



उपचारांद्वारे आरोग्य सुधारण्याचे मार्गदर्शन दिले. या शिबिरात रक्तदाब, रक्तशर्करा (शुगर), हिमोग्लोबिन, नाडी परीक्षण, योगा मार्गदर्शन, प्रकृती निदान, बीएमआय आदी तपासण्या करण्यात आल्या. तसेच काही विशिष्ट आजारांवर आयुर्वेदिक उपचार पद्धतीने मार्गदर्शन करण्यात आले. शिबिराला डॉक्टर, वैद्य आणि राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी सहकार्य केले. शिबिरात सहभागी झालेल्या वैद्यकीय तज्ञांनी आयुर्वेदाच्या जीवनशैली, आहार-विहार, औषधी वनस्पतींचे महत्त्व आणि नियमित दिनचर्येचे फायदे यावर सखोल मार्गदर्शन केले.


या शिबिराला मोठा प्रतिसाद लाभला. प्राध्यापक वृंद, कर्मचारी वृंद व विद्यार्थ्यांनी शिबिरातून मिळालेल्या माहितीचा उपयोग करून आपल्या जीवनशैलीत सकारात्मक बदल करण्याचा निर्धार व्यक्त केला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन तथा आभार प्रोफेसर रमेश वारे यांनी केले. कार्यक्रमास प्राध्यापक वृंद, कर्मचारी वृंद, राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक विद्यार्थी-विद्यार्थिनी यांची उपस्थिती होती. कार्यक्रमास महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मोहम्मद इलयास फाजील यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.

बीड - राष्ट्रीय कांग्रेस चे राज्यसभा खा. रजनीताई अशोकराव पाटील व राष्ट्रीय कांग्रेस चे बीड जिल्हा अध्यक्ष राहुल सोनवने यांच्या मार्गदर्शनाखली प्रभाग क्रमांक १२ मधे विद्युत पोल वरिल एल ए डी स्ट्रेट लाइट चालू करुन घेतांना राष्ट्रीय कांग्रेस चे बीड जिल्हा अध्यक्ष निराधार निराश्रित विभाग शेख मोहसीन बुरहानोद्दीन. यावेळी शेख जाहिर अमीर राष्ट्रीय कांग्रेस चे बीड तालुका अध्यक्ष निराधार निराश्रित विभाग व प्रभागातील नागरिकांचा फोन येताच लगेच काम करुन दिल्याबद्दल नागरिकानी आभार मानले.







## जुलै महिन्याच्या या दुसऱ्या आठवड्यातच नाथ सागराने ७१% सरासरी गाठली

बीड । प्रतिनिधी

आज ११ जुलै २०२५ सकाळी सकाळी चांगली बातमी आहे.. जुलै महिन्याच्या या दुसऱ्या आठवड्यातच नाथ सागराने ७१% सरासरी गाठली आहे.. यासोबतच आवकही २५२५७ क्यूसेक असून आता हे वाढते पाणी गोदावरीत सोडले जाऊन शकते..

इतक्या मोठ्या प्रमाणात आवक असल्याची ही पहिल्यांदाच वेळ असून येणाऱ्या काळात माजलगाव धरणास उजव्या कालव्याद्वारे पाणी प्रवाहित असणार आहे.. चणकवाडी येथील बंधाऱ्याचे गेट काढले असून पैठण शहरात घुसणारे पाणी थांबविण्याच्या उपाययोजना सुरू झाल्या आहेत..

१ जुलै रोजी ४४% पाणीसाठा होता जो आता ११ जुलै रोजी ७१% पर्यंत पोहोचला आहे.. आज सकाळी ६ वाजेपर्यंत ७०.९६% पाणीसाठा जायकवाडी मध्ये होता.. मराठवाड्यात पाऊस नसला तरी नाशिक जिल्ह्यात झालेल्या मुसळधार पावसाने नाथसागरात आवक मोठ्या प्रमाणात सुरूच आहे.. धनंजय गुंदेकर, बीड



# चंदन सर म्हणजे शब्दांची तलवार!

पत्रकारिता ही केवळ बातम्यांचं माध्यम नसून, ती समाजातील आवाज बनण्याची ताकद असते. ही ताकद शब्दांतून जगासमोर मांडणाऱ्या थोडक्याच व्यक्ती असतात आणि त्यांच्यात अग्रक्रमाने नाव घेतलं जातं ते म्हणजे दैनिक सिटीझनचे उपसंपादक पत्रकार चंदन पठाण सर. पत्रकारितेच्या रस्त्यावर चालताना जेव्हा अनेकजण दबाव, राजकीय हितसंबंध, आणि वैयक्तिक भीतीपायी चुकवून चालतात, तेव्हा चंदन सर हे आपल्या सडेतोड आणि तडाखेबाज लेखनशैलीसह कायम निडरपणे आपली भूमिका समाजासमोर ठेवत असतात. त्यांची लेखणी ही केवळ शब्दांची मांडणी नसते, तर ती एक जबाबदारी असते, समाजासाठी, न्यायासाठी, आणि वाचकांच्या विश्वासासाठी.

चंदन सरांचं व्यक्तिमत्त्व जितकं दिलखुलास आणि विनोदी, तितकंच ते विचारांच्या बाबतीत स्पष्ट आणि ठाम आहे. कटाक्षाने सत्य मांडण्याची वृत्ती, चुकीला बिनधास्त विरोध करण्याची ताकद, आणि सर्वसामान्यांच्या प्रश्नांना वाचा फोडण्याची क्षमता यामुळे त्यांनी वाचकांमध्ये आणि सहकाऱ्यांमध्ये विशेष स्थान निर्माण केलं आहे. आज पत्रकारितेच्या क्षेत्रात नव्या पिढीला दिशा दाखवणारे, मार्गदर्शन करणारे पत्रकार अत्यंत मोजके राहिले आहेत. अशा वेळी चंदन पठाण सर हे अनेक नवोदित पत्रकारांसाठी एक चालतं बोलतं मार्गदर्शन आहेत. त्यांच्याशी संवाद साधताना प्रत्येक वेळी नव्याने शिकण्यासारखं काहीतरी मिळतं मग ते पत्रकारितेच्या तंत्राबद्दल असो किंवा जगाकडे पाहण्याच्या दृष्टिकोनाबाबत.

आज त्यांच्या वाढदिवसानिमित्ताने त्यांच्यावर कौतुकाचा वर्षाव होणं, ही त्यांच्या पत्रकारितेतील योगदानाची पोचपावती आहे. लेखणीच्या माध्यमातून जनतेसाठी आवाज उठवणाऱ्या, बातमीच्या प्रत्येक शब्दात सामाजिक भान जपणाऱ्या आणि निर्भीडपणे सत्यासोबत उभे राहणाऱ्या चंदन सरांना यानिमित्ताने पत्रकार, वाचक, सामाजिक क्षेत्रातील कार्यकर्ते आणि सहकारी यांच्याकडून मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या जात असताना मी नेकनूर पत्रकार संघाकडून शुभेच्छा देतो की आपल्या लेखणीची धार अशीच टिकून राहो, आरोग्य आणि यश लाभो, हीच प्रार्थना! वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा, चंदन पठाण सर.



लेखक
**सय्यद अर्शद,**
पत्रकार संघ नेकनूर,बीड

# तीन महिन्यांसाठीच्या रेशनचा कट्टा उचलला ;घरात आनंद ओसंडला!

### जुलै अखेरपर्यंत लाभार्थ्यांना होणार धान्याचे वितरण : राज्य शासनाकडून धान्य वाटपास मुदतवाढ

बीड । दिव्य न्युज

पावसाळ्यात रेशन कार्डधारक लाभार्थी कुटुंबांना जून ते ऑगस्ट या तीन महिन्यांतील मोफत धान्याचे वितरण करण्याची मुदत ३० जून होती. सदरील मुदत संपल्यानंतर आता राज्य शासनाने रेशन धान्य वाटपास मुदतवाढ दिली आहे. त्यामुळे रेशन लाभार्थ्यांना रेशन मिळणार आहे.

जिल्ह्यात अनेक दुर्गम गावे आहेत. मुसळधार पावसामुळे पूरस्थिती निर्माण झाल्यास अनेक गावांचा संपर्क तुटतो. त्यामुळे या काळात त्यांना अन्नधान्य तसेच जीवनावश्यक वस्तूंची गरज भासते. यावर उपाय म्हणून रेशन लाभार्थ्यांना जुलैपासून ते ऑगस्ट महिन्यांपर्यंत मोफत धान्याचे वितरण जून महिन्यात वितरित करण्याचा आदेश राज्य शासनाने काढला होता. यानंतर रेशन लाभार्थ्यांना रेशन वितरित करण्यात आले. परंतु काही ठिकाणी रेशन वितरित झाल्याच्या तक्रारी राज्यभरातून प्राप्त झाल्याने राज्य शासनाने नव्याने आदेश काढत त्यास मुदतवाढ दिली आहे.



### अंगठा घेतला; आता धान्यासाठी चकरा

काही रेशनधारकांनी धान्यासाठी ई-पॉस मशीनवर अंगठा घेतला आहे; मात्र धान्य नसल्याने त्यांना आता धान्यासाठी चकरा मारण्याची वेळ आली आहे. जुलैअखेरपर्यंत त्यांना धान्य मिळणार आहे.

### अनेकांना मिळाला दिलासा

रेशन लाभार्थ्यांना प्रत्येक महिन्यास रेशन दुकानावरून धान्य दिले जाते.

मात्र, यंदा प्रथमच तीन महिन्यांसाठीचा रेशनचा कट्टा एकदाच प्राप्त होत असल्याने अनेकांच्या चेहऱ्यावर आनंद दिसून येत आहे.



### रेशनचे धान्य विकणार त्याचे कार्ड ब्लॉक करणार!

पावसाळ्यात रेशन लाभार्थ्यांना धान्य मिळावे, त्यांची अडचण होऊ नये म्हणून राज्य शासनाने लाभार्थ्यांना एकाच वेळी तीन महिन्यांचे रेशन देण्याची सोय उपलब्ध करून दिली आहे; परंतु काही लाभार्थी रेशनचे धान्य विकत असल्याची चर्चा आहे. रेशनचे धान्य लाभार्थी विकत असेल, तर त्याचे कार्ड ब्लॉक केले जाईल, अशी माहिती पुरवठा विभागाच्या वतीने देण्यात आली आहे.



### आता मुदतवाढ मिळणार का?

१. राज्य शासनाने पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर तीन महिन्यांचे सार्वजनिक वितरण प्रणालीअंतर्गत धान्याचा साठा एकाचवेळी वितरित करण्याचे निर्देश दिले होते. याची मुदत ३० जूनला संपली होती.

२. मात्र, जिल्ह्यातील अनेक लाभार्थ्यांनी रेशनचे तीन महिन्यांचे धान्य उचलले नव्हते. तथापि, ३० जूनची तारीख उलटून गेली असली तरी मुदतवाढ मिळालेली आहे.

३. सध्याही शिधापत्रिकाधारकांना धान्य वाटप केले जात आहे. नुकतीच शासनाकडून मुदतवाढ ३१ जुलैपर्यंत देण्यात आलेली आहे.

दिव्य वार्ता
शुक्रवार ११ जुलै २०२५


## ५० खोके एकदम ओके मधला एक खोका आज दिसला, आदित्य ठाकरेंची संजय शिरसाटांवर टीका

मुंबई । दिव्य न्युज
राज्याचं पावसाळी अधिवेशन मुंबईत सुरू आहे. या अधिवेशनात सत्ताधारी आणि विरोधक विविध विषयांवरून आमने–सामने येत असल्यामुळे राजकारण चांगलंच तापलं आहे. यातच उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेचे आमदार आणि मंत्री वेगवेगळ्या कारणांनी चांगलेच चर्चेत आले आहेत. आमदार संजय गायकवाड यांनी आमदार निवासातील कॅन्टीनमधील एका कर्मचाऱ्याला मारहाण केल्याचा व्हिडीओ व्हायरल झाला होता. त्यामुळे त्यांच्यावर टीकेची झोड उठली होती. असं असतानाच आता मंत्री संजय शिरसाट यांचा पैशाच्या बॅगेबरोबरचा कथित व्हिडीओ व्हायरल झाला आहे. हा व्हिडीओ खासदार संजय राऊत यांनी एक्सवर (ट्विटर) शेअर केला आहे. या व्हिडीओनंतर राज्याच्या राजकारणात एकच खळबळ उडाली आहे.



### सर्व नगर परिषदमध्ये मुख्याधिकारी व काही ठरावीक कर्मचाऱ्यांनी बोगसगिरीचा नंगानाच सुरू केला

### बोगस बिले, गुंठेवारी, लेआऊट सह इतर अनेक गैर कामे चालु आहेत

### माजलगाव सह सर्व नगरपरीषदमध्ये मुख्याधिकाऱ्यांचा बोगसगिरीचा धिंगाना घातला

# माजलगावचे सीओ चंद्रकांत चव्हाण सहा लाखांची लाच घेतांना पकडला!

### १२ लाखांची मागणी, पहिला हप्ता घेताना छत्रपती संभाजीनगर एसीबीची कारवाई







ए.आय.फोटो

### नगरोत्थान योजनेतील कामात अडवाअडवी

संबंधित गुत्तेदाराचे माजलगाव शहरात नगरोत्थान योजनेन रस्त्यांसह इतर ५० कोटी रुपयांची कामे सुरु आहेत. त्यात रस्त्याची ही कामे करताना अतिक्रमण काढणे महत्वाचे होते, मात्र यासाठी सीओ म्हणून चव्हाणने कथीही मदत केली नाही. उलट त्यासाठीही सतत पैशांची मागणी करत होता. यासंदर्भात अप्पर सचिवांपर्यंत तक्रारी करण्यात आल्या. मात्र मोठा वरदहस्त असल्याने चव्हाणवर आतापर्यंत काहीही कारवाई झाली नाही.

### बीड एसीबीच्या पथकाकडून छापे

छत्रपती संभाजीनगरच्या टिमने कारवाई केल्यानंतर तातडीने बीड एसीबीला माहिती देण्यात आली. त्यानंतर बीड एसीबीचे दोन पथके तातडीने लाचखोर चंद्रकांत चव्हाणच्या घराची झडती घेण्यासाठी खाना झाले होते. घरझडतीत काय कारवाई झाली याची माहिती रात्री उशीरापर्यंत मिळू शकली नाही.

### चव्हाणची वादग्रस्त कारकीर्द

चंद्रकांत चव्हाण यांच्याकडे मागील दोन वर्षापासून माजलगाव नगर परिषदेचा कारभार पाहत आहते. याकाळात त्यांनी कधीही सर्वसामान्यांची कामे केली नाही. कधीही नगर परिषदेत उपस्थित राहत नव्हता. केवळ पुढाऱ्यांच्या सांगण्यावरुन सर्वसामान्यांची लूट करण्याचे काम घरातूनच सुरु होते. दोन वर्षापासून माजलगावकरांसाठी एक समस्या बनलेले सीओ चव्हाण एसीबीच्या जाळ्यात अडकल्याने आनंद व्यक्त केला जात आहे.

बीड । दिव्य न्युज
गुत्तेदाराचे काम करण्यासाठी माजलगाव नगर परिषदेचे मुख्याधिकारी चंद्रकांत इंद्रजीत चव्हाण यांनी तब्बल १२ लाख रुपयांच्या लाचेची मागणी केली. पहिला हप्ता म्हणून सहा लाख रुपयांची लाच स्विकारतांना राहत्या घरीच चव्हाणला छत्रपती संभाजीनगरच्या एसीबीने रंगेहाथ पकडले. ही कारवाई गुरुवारी (दि.१०) रात्री नऊच्या सुमारास करण्यात आली.

चंद्रकांत इंद्रजीत चव्हाण असे माजलगाव नगर परिषदेतील लाचखोर मुख्याधिकाऱ्याचे नाव आहे. काही शासकीय कामांशी संबंधित फाईल्स मंजूर करून देण्यासाठी मुख्याधिकारी चव्हाण यांनी गुत्तेदाराला १२ लाख रुपयांच्या लाचेची मागणी केली होती. यासंदर्भातील तक्रार छत्रपती संभाजीनगर एसीबीकडे करण्यात आली, त्यानंतर तक्रारीची सत्यता पडताळल्यानंतर एसीबीने सापळा रचला.

गुरुवारी रात्रीच्या सुमारास माजलगाव शहरातील पिताजी नगरी येथे किरायाच्या घरी चव्हाण याने सहा लाख रुपयांची लाच स्विकारली. यावेळी छत्रपती संभाजीनगर येथील एसीबीचे प्रमुख केशव दिंडे यांच्यासह त्यांच्या टिमने चव्हाणला रंगेहाथ पकडले. एसीबीकडून घर झडती घेतली जात असून रात्री उशीरापर्यंत कारवाई सुरु होती. या कारवाईने माजलगाव शहरात खळबळ माजली आहे. दरम्यान रात्री उशीरापर्यंत माजलगाव शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु होती

घर झडतीत सापडले मोठे घबाड ?
सीओ चंद्रकांत चव्हाणच्या माजलगाव शहरातील पिताजी नगरी येथील घरासह जामखेड येथील घरामध्ये मोठे घबाड सापडल्याची माहिती आहे. रात्री उशीरापर्यंत ही आकडेवारी समजू शकली नाही. माजलगाव येथेच मोठ्या प्रमाणात चव्हाणने अपसंपदा कमावल्याचे बोलले जात आहे.

### आता बाकीच्यांच्या पापाचा घडा कधी भरणार

गेल्या ३–४ वर्षापासून निवडणुका नसल्यामुळे नगर पालिका, नगर पंचायतीमध्ये मुख्याधिकाऱ्यांचाच कारभार आहे. त्यांच्या कारभारावर कोणाचा अंकुश नाही, ते म्हणतील ती पुर्व दिशा आहे. नागरिकांचे जीवन मरणाचे प्रश्न सोडविण्यापेक्षा गुत्तेदारांची बिले काढणे, टेंडर काढणे, अव्वाच्यासव्वा खरेदी करणे यातच काही मुख्याधिकारी व्यस्त असतात. बीड जिल्ह्यात अजुनही काही असे अधिकारी आहेत जे चव्हाणांच्याच पावलावर पाऊल टाकून काम करत आहेत. त्यांचा नंबर आता कधी लागणार? असा सवाल उपस्थित केला जात आहे. चव्हाण पुर्वीज्या नगर पालिकेत होते तिथेही त्यांची कारकिर्द फारशी चांगली नव्हती.

### बीड नगर पालिकेत चव्हाणला यासाठीच आणायचे होते का ?

बीड मधील एका युवा नेत्याने माजलगावचे मुख्याधिकारी चंद्रकांत चव्हाण यांना बीड नगर पालिकेत आणण्यासाठी मुंबईत फिल्डींग लावली होती. नेत्यांकडेही त्याच्या नावाची शिफारस केलेली होती. माजलगाव नगर पालिकेत जो मुख्याधिकारी लाखो रुपयांची लाच घेतांना पकडला, या अगोदर त्याने काय काय केलं असेल हे माहित नाही आणि इतका भ्रष्ट अधिकारी बीड नगर पालिकेमध्ये असे कुटाणे करण्यासाठीच आणायचा होता का असा प्रश्न उपस्थित होत आहे.

### मी पैसे घेतले नाही, काहीतरी मॅनेज करा..

घरात ऐटीत बसलेला चव्हाणच्यासमोर लाचेचा पहिला हप्ता म्हणून सहा लाख रुपये ठेवण्यात आले. ते स्विकारल्यानंतर त्यास लगेच एसीबीच्या कारवाईची भनक लागली. त्याने लगेच 'हे पैसे माझे नाहीत, मी पैसे मागितले नाहीत.. असा आरडाओरडा सुरु केला. तसेच काहीतरी मॅनेज करा अशी विनंतीही चव्हाण करत होता.

## लाल बावटा कामगार संघटनेच्या वतीने वडवणी तहसील कार्यालयावर जोरदार निदर्शने

वडवणी । दिव्य न्युज
सेंटर ऑफ इंडियन ट्रेड युनियन्स सिटू कामगार संघटना व कामगार कृती समितीच्या वतीने देशभर काम बंदची हाक दिली होती या हाकेला ओ देत वडवणी तालुक्यात सिटु कामगार संघटना व लाल बावटा बांधकाम संघटनेच्या वतीने वडवणी तहसील कार्यालय जोरदार निदर्शने करण्यात आली. हा संप केंद्र व राज्य सरकारच्या कामगार व शेतकरी शेतमजूर विरोधी धोरणामुळे कामगारांचे अनेक प्रश्न प्रलंबित आहेत.इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या योजनेतील लाभ तात्काळ मिळत नाही.शालेय पोषण आहार कामगारांना जाहिर केलेले वाढीव मानधन आद्याप मिळालेले नाही.आशा व गटप्रवर्तक यांना अत्यंत अल्प मानधनात काम करून घेतले जाते.व त्याच्या भविष्याची कोणत्याही प्रकारची हामी नाही. कामगार कायदे मोडीत काढून चार ४ कामगार श्रम संहिता लागू करणार असल्यामुळे खाजगी कारखानदारांना कामगारांच्या शोषणाचे संधी मिळाली आहे.त्यामुळे कामगार कृती समितीने देशपातळीवर आज संप पुकारण्यात आलेला आहे.




या संपाला पाठिंबा देण्यासाठी आज वडवणी तालुक्यातील कामगार सिटू संघटनेच्या नेतृत्वाखाली एकत्र येऊन वडवणी तहसील कार्यालय जोरदार निदर्शने करण्यात आली या वेळी कॉ.ओम पुरी यांनी कामगारांना निवेदन वाचुन दाखवले हे निदर्शने का करण्यात येत आहेत याची संपूर्ण माहिती दिली व या धरणे आंदोलनाला कॉ.दत्ता डाके यांनी मार्गदर्शन केले. व खालील मागण्याला घेऊन निदर्शने करण्यात आली कामगार विरोधी मालकधार्जण्या ४ चार श्रमसंहीता रद्द करा., बांधकाम कामगारांच्या योजनाला सेवा हमी कायदा लागू करा.म्हणजे बांधकाम कामगारांना योजनेचा लाभ तीन महिन्यांच्या आत मिळेल.सार्वजनिक उद्योगांचे खाजगीकरण थांबवा, बांधकाम कामगारांसाठी जाहिर केलेले ५००० रू दिवाळी बोनस तात्काळ द्यावे, कामगार व शेतकऱ्यांना राशन कार्ड द्यावे,राशन कार्ड वरील नावे लवकर दुरुस्त करून द्यावी, गेल्या शैक्षणिक वर्षात कामगारांना पाल्यांची शिष्यवृत्तीचे पैसे तात्काळ द्या ,बांधकाम कामगारांच्या योजनाला सेवा हमी कायदा लागू करा म्हणजे बांधकाम कामगारांना योजनेचा लाभ तीन महिन्यांच्या आत मिळेल., बांधकाम कामगारांसाठी पुर्वी सारखी साहित्य खरेदी योजना सुरू करा .,बांधकाम कामगारांना भांडी नको पैसे द्या.शेतकऱ्यांना संपूर्ण कर्जमाफी द्या. शेतकऱ्यांचा माल हमीभावाने खरेदी करा., जनतेच्या लोकशाही अधिकारांवर गदा आणणारे महाराष्ट्र जन सुरक्षा विधेयक मागे घ्या.आशा व गटप्रवर्तकाचे सहा महिन्यांचे थकीत मानधन द्या.शालेय पोषण आहार कामगारांच्या मानधनात केलेली एक १००० रु वाढ तात्काळ द्या., कामरांना किमान वेतन २६००० रू द्या , निर्धारांना वेळेवर पेन्शनचे पैसे द्या., घरकुल लाभार्थीच्या खात्यावर घरकुलर हाफत्याचे पैसे तात्काळ द्या., शेतकऱ्यांना तात्काळ पिक कर्ज द्या,गायरानात व इतर जागेत बांधलेली घरे व वीस वर्षे पासून कसत असलेली गायरान जमिन शेतमजूराच्या नावे करा.,घरकुल योजनेचे अनुदान साडेचार लाख करा .,ऊसतोड मजुरांच्या मुलाना ऊसतोड कामगार महामंडळाकडू शिष्यवृत्ती योजना सुरू करा वरील सर्व मागण्याचा घेऊन जोरदार घोषणाबाजी करण्यात आली व तहसील परिसर घोषणाणी दनदनून निघाला .मा.तहसिलदार साहेब यांनी आंदोलकाजवळ येऊन निवेदन स्वीकारले व सकारात्मक चर्चा करून या मागण्या शासनास पाठवून व स्थानिकच्या मागण्यावर तात्काळ कार्यवाही करण्याचे आदेश दिले.




औरंगाबाद राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे जिल्हा सरचिटणीस नवी पटेल यांनी मुंबई येथे राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष व महाराष्ट्रचे उप मुख्यमंत्री अजित पवार यांना भेटून मुस्लिम समाज आणि त्यांच्या समस्या दूर करण्यासाठी प्रयत्न करून त्यांना सोडण्यात यावे असे आवाहन केले यां प्रसंगी आमदार विक्रम काळे आदी उपस्थित होते.

## बीड जिल्हा बँकेच्या अध्यक्षपदी निवड होताच जिल्हाधिकाऱ्यांनी घेतली बैठक

### समितीच्या सदस्यपदी चार जणांची केली नियुक्ती



डीसीसी बँकेच्या अध्यक्षपदी निवड होताच जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी कामकाजाला सुरुवात केली. यावेळी इतर अधिकारी व कर्मचारी.

बीड । दिव्य न्युज
जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या प्राधिकृत अधिकारी समितीच्या अध्यक्षपदी जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांची तसेच समितीच्या सदस्यपदी चार जणांची नियुक्ती करण्यात आली आहे. गुरुवारी जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी बँकेच्या अध्यक्षपदाचा पदभार स्वीकारला तसेच प्रत्यक्ष कामकाजाला सुरुवात केली. बँकेचा कारभार सुधारण्यासह प्रत्येकाने चांगले काम करावे, अशा सूचना जिल्हाधिकारी विवेक यांनी दिल्या. लातूर येथील विभागीय सहनिबंधकांनी ८ जुलै, २०२५ रोजी यासंदर्भात आदेश पारित केले होते. त्यानुसार जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांची बँकेच्या प्राधिकृत अधिकारी समितीचे अध्यक्ष म्हणून, तर प्राधिकृत अधिकारी समितीचे सदस्य म्हणून सहकारी संस्थांचे जिल्हा उपनिबंधक सतीश तोटावार, जिल्हा विशेष लेखा परिक्षक, वर्ग–१ सतीश पोकळे, सहायक निबंधक, सहकारी संस्था (प्रशासन) अशोक कदम तसेच अंबाजोगाई येथील ज्येष्ठ विधिज्ञ ॲड. अशोक कवडे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. त्यानुसार प्राधिकृत अधिकारी समितीचे नूतन अध्यक्ष व समिती सदस्यांनी १० जुलै रोजी पदभार स्वीकारला. यावेळी बँकेचे अध्यक्ष व सदस्य प्राधिकृत अधिकारी समिती यांचा बँकेच्या वतीने सत्कार करण्यात आला.

### २४५ कोटींचे पीककर्ज वाटप

जिल्हा बँकेला चालू खरीप हंगामात २९० कोटी रुपयांचे पीककर्ज उद्दिष्ट दिले होते. आतापर्यंत २४५ कोटी रुपयांचे पीककर्ज वाटप केल्याचे बँकेच्या अधिकाऱ्यांनी सांगितले.

### ५०० कोटींच्या निधीची प्रतीक्षा

जिल्हा बँकेची आर्थिक स्थिती सक्षम करण्याच्या अनुषंगाने शासनाकडे ५०० कोटी रुपयांची मागणी करण्यात आली असून, तसा प्रस्ताव राज्य सहकारी बँकेकडे मागील दीड वर्षांपासून पडून आहे.

### प्रशासकीय मंडळ अध्यक्षांचा कार्यकाळ

७ एप्रिल २०२१ ते ३ नोव्हेंबर २०२२– अविनाश पाठक
४ नोव्हेंबर २०२२ ते २६ ऑगस्ट २०२३ – समृत जाधव
२७ ऑगस्ट २०२३ ते ९ जुलै २०२५– अविनाश पाठक
१० जुलैपासून – विवेक जॉन्सन

### आढावा घेत सूचना

पदभार स्वीकारल्यानंतर अध्यक्ष व सदस्यांनी मुख्य कार्यालयातील बँकेच्या विभागनिहाय प्रमुख अधिकाऱ्यांकडून तपशिलवार माहिती जाणून घेतली. याप्रसंगी सर्व विभागप्रमुखांना सूचना देण्यात आल्या. बँकेच्या कामकाजाचा आढावा संपल्यानंतर सर्व विभागांना प्रत्यक्ष भेटी देऊन तसेच बँकेच्या प्रत्यक्ष कामाचा आढावा घेऊन मार्गदर्शन केले.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक मोहम्मद अबुबकर यांनी माऊली ऑफसेट एमएसईबी ऑफीससमोर माळीवेस बीड येथे छापून सां.दिव्यवार्ता कार्यालय कोहिनूर बेकरीजवळ, इस्लामपुरा रोड, बाबा चौक, भालदारपुरा बीड येथे प्रकाशित केले. या अंकात प्रसिध्द झालेल्या बातम्या व लेख यामधुन व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.वाद विवाद बीड न्यायालय अंतर्गत मो.९३७१२९१०४२, ९५४५३८१२२०, फोन नंबर : ०२४४२–२३१२२०, फॅक्स नंबर : ०२४४२–२३१२२०